दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १६१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.२२ जानेवारी २०२५


।।सुविचार।।

जगा इतकं कि आयुष्य कमी पडेल,
हसा इतके कि आनंद कमी पडेल,
काही मिळाले तर नशिबाचा खेळ आहे,
पण प्रयत्न इतके करा कि,
परमेश्वराला देणे भागच पडेल.

## केवळ ४० हजारांसाठी दरोडेखोरांनी घेतला जीव



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, बुलडाणा :** बोराखेडी पोलीस ठाणेच नव्हे संपूर्ण बुलढाणा जिल्हा पोलीस दलासाठी दाभाडी येथील दरोडा तपासाच्या दृष्टीने कडवे आव्हान ठरले आहे. या घटनेच्या प्राथमिक तपासात अनेक धक्कादायक बाबी पुढे आल्या आहेत. केवळ चाळीस हजारांच्या दागिण्यासाठी एका निष्पाप महिलेचा जीव घेतला गेला. तसेच तिच्या पतीला गंभीर जखमी करण्यात आले. सुदैवाने या दाम्पत्याची एकुलती एक कन्या गावाबाहेर गेली असल्याने बचावली. मात्र अल्पवयात तिने आईचे छत्र गमावले.

या घटनेची गुंतागुंत लक्षात घेता तपास अधांतरीच असून दरोडेखोरांचा शोध घेण्यात बोराखेडी पोलिसांना यश मिळाले नाही, असे घटनेच्या दुसऱ्या दिवशीचे चित्र आहे. मोताळा तालुक्यातील दाभाडी या गावात १९ जानेवारीला पहाटे हा दरोडा पडला. पशुचिकित्सक असलेले डॉक्टर गजानन टेकाडे (४२) आणि त्यांच्या पत्नी माधुरी टेकाडे (३५) हे दोघेच घरी होते. दहावीत शिकणारी मुलगी सृष्टी (१६) ही क्रीडा स्पर्धेसाठी शिर्डी येथे गेली होती. अज्ञात दरोडेखोरांच्या टोळीने घरात प्रवेश केला. या वेळी टोळीकडून गुंगीच्या औषधाचा जास्त वापर करण्यात आला असावा असा अंदाज आहे. याचे कारण गजानन टेकाडे हे काल रविवारी सकाळी त्यांचे नातेवाईक आले तेव्हाही बेशुद्धच होते. रविवारी त्यांना जळगाव खान्देश येथील रुग्णालयात भरती करण्यात आले, तेव्हा ते संध्याकाळपर्यंत बेशुद्धच होते. आज सोमवारी ते शुद्धीवर आल्याचे सांगण्यात आले. मात्र ते फारसे बोलण्याच्या मनस्थितीत नव्हते. माधुरी टेकाडे या मृतावस्थेत पडल्या होत्या. १९ जानेवारीच्या सकाळपासूनच दाभाडी या गावाला लष्करी छावनीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पोलीस अधीक्षकांसह, दोन अतिरिक्त पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, अन्य वरिष्ठ व अनुभवी पोलीस अधिकारी, विविध शाखांचे प्रमुख, श्वान पथक, हस्तमुद्रा तज्ज्ञ गावात दाखल झाले. घटनेच्या तपासासाठी तीन पथक गठीत करण्यात आले. ठाणेदार सारंग नवलकार तपास करीत आहेत. मात्र हा तपास स्थानिक गुन्हे शाखा वा अन्य यंत्रणेकडे जाण्याची दाट शक्यता आहे.

किरकोळ जखमी करून लूटमार करणे अशी दरोडेखोरांची आजवरची पद्धत राहिली आहे. मात्र या घटनेत दरोडेखोरांनी महिलेचा जीव घेण्यास मागेपुढे पहिले नाही. टेकाडे यांनी संभाव्य धोका लक्षात घेऊन अलीकडेच सीसीटीव्ही यंत्रणा विकत आणली होती असे आढळून आले. मात्र काही कारणामुळे ती कार्यान्वित करण्याचे राहून गेले. ही यंत्रणा सुरु असती तर कदाचित महत्वाचे पुरावे पोलिसांना मिळाले असते.

## तुर्कीतील स्की रिसॉर्ट हॉटेलला भीषण आग!
### ६६ जणांचा मृत्यू, ५१ जण जखमी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, तुर्कस्तान :** उत्तर तुर्कस्तानमध्ये एका स्की रिसॉर्ट हॉटेलला मंगळवारी लागलेल्या आगीत किमान ६६ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत ५१ जण झकमी देखील झाले आहेत, तुर्कीचे अंतर्गत विभागाचे मंत्री अली येरलीकाया यांनी याबद्दल माहिती दिली आहे. आम्ही अत्यंत दुखात आहोत. या हॉटेलला लागलेल्या आगीत दुर्दैवाने आम्ही ६६ जीव गमावले आहेत, अशी प्रतिक्रिया येरलिकाया यांनी बोलू प्रांतातील कार्तालकाया येथील आग लागलेल्या ग्रँड कार्टल हॉटेलची पाहणी केल्यानंतर दिली. तर आरोग्य मंत्री कमाल Memišolu यांनी जखमी असलेल्यांपैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले. पहाटे साडे तीनच्या सुमारास ११ मजली ग्रँड कार्टल हॉटेलच्या रेस्टॉरंट असलेल्या मजल्यावर ही भीषण आग लागली. मात्र आगीच्या कारणांचा शोध घेतला जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**इमारतीबाहेर उडी मारल्याने दोघांचा मृत्यू**

हॉटेलला आग लागल्यानंतर इमारतीतून जीव वाचवण्यासाठी बाहेर उडी घेतल्याने दोघांचा मृत्यू झाल्याचे गव्हर्नर अब्दुलाझीझ आयदीन यांनी सांगितले. तर काही जणांनी हॉटेलमधील चादरी आणि ब्लँकेट एकत्र बांधून आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती खाजगी एनटीव्ही चॅनल्ने दिली.

आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी घटनास्थळी अनेक अग्निशमन वाहाने दाखल झाली, यावेळी इमारतीच्या खिडक्यांमधून खाली लटकणाऱ्या चादरी पाहायला मिळाल्या.

## दि.२५ जानेवारी रोजी १५ व्या राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमाचे आयोजन

**दि.२१, ठाणे :** दि.२५ जानेवारी २०२५ रोजी १५ वा राष्ट्रीय मतदार दिवस राज्यस्तर, जिल्हास्तर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करावयाचा आहे. या १५ व्या राष्ट्रीय मतदार दिवसासाठी छेंोहलपस श्रळज्ञश णेींळपस. ख तेींश षेीं ीेंअॅश हा विषय आयोगाकडून देण्यात आला आहे. मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार दि.२५ जानेवारी २०२५ हा कामकाजाचा दिवस नसल्याने दि.२४ जानेवारी २०२५ रोजी जिल्हातील सर्व कार्यालयामध्ये मतदान शपथ घेण्यात यावी (मराठी, इंग्रजी व हिंदी मधील शपथेचा नमुना सोबत जोडला आहे), असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांनी केले आहे. ठाणे जिल्ह्याचा जिल्हास्तरीय कार्यक्रम दि.२५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे हे असतील तर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांचे मतदार नोंदणी अधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत.

# पुण्यात दुर्मिळ गुइलेन बॅरे सिंड्रोमचे २२ संशयित रुग्ण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, पुणे :** गेल्या काही दिवसांपासून पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोम या अतिशय दुर्मिळ अशा व्याधीची मोठी चर्चा पाहायला मिळत आहे. एका महिलेला या व्याधीनं ग्रासल्यानंतर डॉक्टरांच्या पथकानं तिच्यावर यशस्वीपणे उपचार केल्यामुळे तिने त्यावर मात केल्याचं वृत्ती समोर आलं होतं. पण आता पुण्यात या दुर्मिळ व्याधीचे तब्बल २२ संशयित रुग्ण आढळल्याचं समोर आलं आहे. पुणे महानगर पालिकेकडे अशा प्रकारचे २२ संशयित रुग्ण आढळल्याची माहिती देण्यात आली आहे. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुणालय व पूना हॉस्पिटलमध्ये या आजाराशी संबंधित लक्षणं आढळल्याची तक्रार असणारे रुग्ण दाखल झाल्यानंतर ही माहिती महानगर पालिकेला कळवण्यात आली आहे.

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व पूना हॉस्पिटल या दोन रुग्णालयांमध्ये या व्याधीशी संबधित लक्षणं दिसून आल्याची तक्रार घेऊन रुग्ण दाखल झाले आहेत. हे रुग्ण प्रामुख्याने सिंहगड रोड परिसरातले असल्याचं इंडियन एक्स्प्रेसनं दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे. या दोन रुग्णालयांव्यतिरिक्त इतरही रुग्णालयांमध्ये काही संशयित रुग्णांना दाखल करण्यात आलं आहे.



**प्रशासन सज्ज, संबंधित परिसरात पथक पाठवणार!**

दरम्यान, पुणे महानगर पालिकेच्या सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली जाधव यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. तसेच, संबंधित परिसरात परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी एक पथक पाठवण्यात येईल, असंही त्यांनी नमूद केलं आहे. सध्या आम्ही या भागातील एकूण सहा रुग्णांच्या रक्ताचे नमुने गोळा केले आहेत. हे सर्व नमुने इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च – नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ व्हायरोलॉजी (ICMR-NIV) कडे पाठवण्यात आले आहेत, अशी माहिती डॉ. वैशाली जाधव यांनी दिली आहे.

**डॉक्टरांनी केला 'या' लक्षणांचा उल्लेख!**

एकीकडे २२ संशयित आढळले असताना दुसरीकडे काही डॉक्टरांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना काही ठराविक लक्षणांचा उल्लेख केला आहे. सिंहगड रस्ता आणि आसपासच्या परिसरातील रुग्णांकडून जुलाब, ताप आणि अशक्तपणासारख्या तक्रारी केल्या जात आहेत. या रुग्णांना गुईलेन बॅरे सिंड्रोमची लागण झाल्याचं दिसून आलं, अशी माहिती दीनानाथ मंगेशकर रुणालयाचे सल्लागार डॉ. समीर जोग यांनी दिली.

गेल्या आठवड्याभरातच दीनानाथ मंगेशकर रुणालयात दाखल झालेल्या १६ रुग्णांनी ही लक्षणं जाणवत असल्याचं सांगितलं. त्यात सहा लहान मुलांचा समावेश आहे. हे सर्व रुग्ण धायरी, सिंहगड रोड आणि किरकटवाडी परिसरातले होते. या १६ पैकी ८ रुग्णांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आलं आहे, अशी माहितीही डॉ. जोग यांनी दिली आहे. दुसरीकडे पूना हॉस्पिटलमध्ये तीन रुग्ण दाखल झाल्याची माहिती रुग्णालयाचे कन्सल्टिंग इंटेन्सिव्हिस्ट डॉ. अजित तांबोळकर यांनी दिली. रुग्णालयात अशा प्रकारचे तीन रुग्ण असून ते सिंहगड रोड व माणिक बाग परिसरातले आहेत, असं ते म्हणाले.

**काय आहे गुइलेन बॅरे सिंड्रोम?**

गुइलेन बॅरे सिंड्रोम हा एक दुर्मीळ आजार आहे. तो दर वर्षी १ लाख लोकांमध्ये एका व्यक्तीला होतो. याचे निदान गुंतागुंतीचे असते. चेतासंस्थेच्या चाचण्या आणि स्पायनल फ्लुइड चाचण्या याच्या निदानासाठी आवश्यक असतात. आयव्हीआयजी अथवा प्लाझ्मा एक्स्चेंजसारख्या उपचारांमुळे रुग्णाला लवकरात लवकर मदत मिळू शकते. या आजाराचे बहुतेक रुग्ण बरे होत असले, तरी २० टक्के रुग्णांना सहा महिन्यांनंतरही हालचालींमध्ये अडचणी येतात.

## प्लास्टिक पिशव्यांचा बिनधास्त वापर आणि केवळ दिखाव्याची कारवाई

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२१, डोंबिवली (ठाणे) :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत प्लास्टिक पिशव्यांवर सरकारी आदेशाने बंदी असली तरी प्रत्यक्षात मात्र सर्रासपणे पिशव्यांचा वापर सुरू आहे. पथकांची कागदोपत्री छापेमारी, फोटो आणि 'आम्ही कडक कारवाई करतोय' अशी माहिती पसरवली जात असली , तरी बाजारात प्लास्टिक पिशव्यांची उपलब्धता व वापर जोरात सुरू असल्याचे सत्य समोर आले आहे.

बाजारात सर्रास व्यवहार सुरू असल्याचे आमच्या प्रतिनिधींनी बाजारात पाहणी केली असता, अनेक व्यापारी, दुकानदार आणि छोटे विक्रेते प्लास्टिक पिशव्यांचा वापर करताना दिसले. महापालिकेचे अधिकारी फक्त काही दुकानांवर कारवाई करून जातात. बाकी वेळी आम्ही तेच करतो जे इतर करतात, असे एका दुकानदाराने सांगितले. खोटी माहिती आणि फसवी कारवाई? महापालिकेच्या कारवाईचे फोटो व माहिती समाजमाध्यमांवर ठळकपणे मांडण्यात येते, पण वस्तुस्थिती वेगळी आहे. असे प्रकार अधिकाऱ्यांची 'आमचं काम सुरू आहे' ही भासवण्याची वृत्ती दाखवत आहेत का, हा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.



आम्हाला फक्त सांगितलं जातं की बंदी घातली आहे, पण दुकानांतून प्लास्टिक बिनधास्त दिलं जातं. नियम सर्वांना सारखे लागू व्हायला हवेत. ही दिखावेगिरी बंद करून योग्य पद्धतीने अंमलबजावणी व्हावी, असे एका जागरूक नागरिकाने रोखठोक मत मांडले. महापालिकेची भूमिका अस्पष्ट महापालिका आयुक्तांनी या मुद्द्यावर ठोस उत्तर देणे अपेक्षित आहे. 'केवळ छायाचित्रे काढून प्रसिद्धी करण्यासाठी प्लास्टिक बंदीची लढाई लढली जात आहे का?' असा सवाल अनेकांनी उपस्थित केला आहे. नागरिक आता या परिस्थितीवर चांगल्याच खवळलेले असून, महापालिकेने योग्य तो कारवाईचा अंकुश लावावा अशी मागणी करत आहेत. प्लास्टिक प्रदूषणाच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कायदेशीर व लोकसहभाग आधारित उपक्रम आवश्यक आहेत. आता महापालिका यावर त्वरित कारवाई करणार की पुन्हा दिखावा करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल!

## एसटीच्या मोकळ्या जागा विकासकाच्या घशात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, बुलडाणा :** नागपूर : एसटी महामंडळाच्या मोकळ्या जागा इतक्या सहजतेने विकासकाच्या घशात घालायला एसटी ही धर्मादाय संस्था वाटली का? असा संतप्त सवाल महाराष्ट्र एस. टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे. या व्यवहारातील घोटाळ्याच्या संशयाबाबतही त्यांनी महत्वाची माहिती दिली. राज्यभरात पसरलेल्या एसटीच्या १ हजार ३६० हेक्टर मोकळ्या जागांचा विकास टप्प्या- टप्प्याने व्हायला हवा, एकदम सर्व जागा विकसित करणे हे घाईचे ठरणार असून महाराष्ट्र चेंबर ऑफ हाउसिंग इंडस्ट्रीजने भरवलेल्या प्रदर्शनाला भेट देऊन त्या प्रसंगी परिवहन मंत्र्यांनी स्वतः हून जागा विकसित करण्यासाठी विनंती करणे हे गैरवाजवी व शंकास्पद असून अश्या प्रकारे जागा वाटायला एसटी ही धर्मादाय नाही. सदर प्रकारे व्यवहार झाल्यास यात पुन्हा काही काळेबेरे होऊ शकते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष द्यायला हवे, असेही श्रीरंग बरगे म्हणाले. एसटीच्या मोकळ्या जागा विकसित करण्यासाठी क्रीडाई या संस्थेने आपले योगदान द्यावे, असे आवाहन त्याच्याच प्रदर्शनात सहभागी होत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले होते. परंतु मागील अनुभव पाहता मोकळ्या जागांचा विकास टप्पा टप्प्याने अंदाज घेऊन केला पाहिजे. या जागा एवढाच मौल्यवान दागिना लालपरीच्या अंगावर शिल्लक असून त्या इतक्या सहजतेने व स्वतःहून दान करायला एसटी ही धर्मादाय संस्था नाही. एसटीच्या ७६ वर्षापासून पडीक असलेल्या जमिनीच्या विकासाचा सुद्धा विचार व्हायला पाहिजे. पण असे निर्णय इतक्या सहजतेने व घाई घाईने होऊ नयेत. या पूर्वीचा अनुभव पाहता नीट लक्ष देऊन व अभ्यास करून या जागांच्या बाबतीत निर्णय घेण्यात आला पाहिजे.तसे झाले नाही व नीट लक्ष दिले नाही तर घोटाळे होत राहतील.व राजकारणी आपले हात धुऊन घेतील अशी शंकाही बरगे यांनी उपस्थित केली आहे.

**लिझचा कालावधी ६० वर्षांवरून ९९ वर्षे**

बांधा वापरा आणि हस्तांतरित करा. ही योजना चांगली आहे. त्याचे नियमही चांगले आहेत. पण त्याचे नियम व अटी विशिष्ट कंत्राटदारांना फायद्याच्या ठरतील असे बनवणे त्याच्या लिझचा कालावधी ६० वर्षावरून ९९ वर्षे करणे हे घाईचे व कुणाच्यातरी सोईचे होऊ नये. एसटीत अश्या प्रकारच्या योजना राबविताना राजकारणी हस्तक्षेप करतात. हे वारंवार सिद्ध झाले आहे. हल्लीचे उदाहरण द्यायचे झाल्यास १ हजार ३१० भाडे तत्वावरील गाड्या घेण्याच्या निविदेत ऐनवेळी नियम व अटी विशिष्ट कंत्राटदारांना फायद्याच्या ठरतील अशा प्रकारे टाकून विशिष्ट कंत्राटदार कंपनीला दबाव आणून ठेका देण्यात आला. त्या प्रकरणात राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिले व स्वतः लक्ष घालून हे कंत्राट रद्द करायला भाग पाडले.

**एसटी आगारातील खड्डे भरण्याच्या कंत्राटात घोळ**

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळात एसटीच्या स्थानक परिसरातील खड्डे भरून तिथल्या रस्त्यांचे नूतनीकरण करण्यासाठी एम. आय. डी. सी. कडून ७०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा केली. पण हा निधी लेखी मागणी करून सुद्धा एसटीकडे वर्ग करण्यात आला नाही. हे काम एम. आय. डी. सी.ने परस्पर आपल्या कंत्राटदारांना दिले. यात सुद्धा नक्की घोळ झाला असून त्या कामाचा दर्जा चांगला दिसत नाही. तसेच त्या कंत्राटदारांवर एसटीचे नियंत्रण नसल्याने त्यांना कामातील त्रुटी बद्दल एसटीच्या अधिकाऱ्यांना काहीही बोलता येत नाही. म्हणून नवीन चांगले प्रकल्प राबविण्यात आले पाहिजेत.

अक्षराज




## भारतीय हवामानशास्त्र विभाग

देश स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय हवामानशास्त्र विभागाला जागतिक हवामानशास्त्र संघटनेचे संस्थापक सदस्यत्व प्राप्त झाले आणि या विभागाच्या म हासंचालकांना या संघटनेचे कायमस्वरूपी प्रतिनिधित्व मिळाले. जागतिक हवामानशास्त्र संघटना व संयुक्त राष्ट्रांचा विकास कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने काही तरुण वरिष्ठ शास्त्रज्ञांना विकसित देशांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले. तसेच तेथील तज्ज्ञांना भारतात बोलावून त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ भारतीय शास्त्रज्ञांना करून देण्यात आला. भारतीय हवामानशास्त्र विभाग २००६ सालापासून नव्याने तयार झालेल्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या अखत्यारीत कार्यरत आहे. हवामानाच्या विविध घटकांची देशातील विविध भागांत, विविध कालावधींत सतत निरीक्षणे घेणे. त्यांच्या नोंदींचे विश्लेषण, त्यावर आधारित सद्या:स्थितीचे व पुढील काळासाठीचे पूर्वानुमान कृषी, जलसंधारण, नौकानयन, हवाई वाहतूक, समुद्रातील इंधन शोधन इत्यादी हवामान संवेदनक्षम क्षेत्रांना व सर्वसामान्य जनतेला पुरवणे हे काम हा विभाग करतो. हवामानाच्या आपत्तींचे विभागनिहाय पूर्वानुमान वर्तवणे व त्यासंबंधी योग्य तो इशारा देणे, हवामानशास्त्र व त्याला संलग्न असलेल्या विषयात संशोधन करणे आणि अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे हेही या विभागाच्या कामात समाविष्ट आहे.

वैज्ञानिक संशोधनकार्याची व्यवस्थित रचना करण्यासाठी प्राध्यापक भगवंतम यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन झाली होती. या समितीच्या शिफारशीनुसार ०१ एप्रिल १९७१ रोजी भारतीय हवाम ानशास्त्र विभागाचे काही कक्ष व वेधशाळा यांचे तीन स्वायत्त संस्थांमध्ये रूपांतर झाले. पुण्यातील भारतीय हवामानशास्त्र विभागातील उष्णदेशीय हवामानशास्त्र संस्था या कक्षाचे रूपांतर भारतीय उष्णदेशीय हवाम ानशास्त्र संस्थेत झाले. कोडाईकॅनाल येथील खगोल भौतिकशास्त्राचे कार्य करणारी वेधशाळा ही बेंगलोर इथे भारतीय खगोल भौतिकशास्त्र संस्था झाली. कुलाबा आणि अलिबाग या भूचुंबकत्वाचे कार्य करणाऱ्या वेधशाळांची मिळून कुलाबा इथे भारतीय भूचुंबकत्व संस्था झाली. भारतीय उष्णदेशीय हवामानशास्त्र संस्था ही भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या अखत्यारीत तर भारतीय खगोल भौतिकशास्त्र संस्था व भारतीय भूचुंबकत्व संस्था या भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या अखत्यारीत कार्य करीत आहेत. भारतीय हवामानशास्त्राच्या प्रगतीमधील हा सर्वात मोठा पल्ला आहे. देशात वैज्ञानिक संशोधनासाठी व सेवेसाठी संगणकाचा वापर प्रथम भारतीय हवाम ानशास्त्र विभागाने केला. लांब पल्ल्याच्या हवामानाच्या पूर्वानुमानाचा पद्धतशीरपणे विकास जगात भारतीय हवामानशास्त्र विभागाने प्रथम केला हे विशेष. भारतीय हवामानशास्त्र विभाग हा जागतिक हवामानशास्त्र परिषदेच्या सहा विशेष क्षेत्रिय हवामानशास्त्र केंद्रांपैकी एक आहे. हवामानाचे पूर्वानुमान वर्तविणारे केंद्र, कृषीविषयक हवामान सल्ला सेवा केंद्र, जलवायू केंद्र, पूरविषयक माहिती केंद्र, चक्रीवादळ माहिती केंद्र, देशाच्या कानाकोपऱ्यात शेकडोंनी असलेल्या जमि नीवरील तसेच हिमाच्छादित प्रदेशावरील वेधशाळा, उंच हवेच्या ठिकाणी असलेली निरीक्षण स्थानके, ओझोन व किरणोत्सर्जन मोजणाऱ्या वेधशाळा, हवामानाची रडार आणि भूकंपमापन यंत्रणा या सर्वांचे जाळे तयार केले असून त्याद्वारे भारतीय हवामानशास्त्र विभागाचे मुख्यालय आणि सर्व क्षेत्रीय कार्यालये व वेधशाळा एकमेकांशी जोडलेले आहेत. हवामानाची निरीक्षणे व अभ्यास यांसाठी भूस्थिर, कल्पना, मेघाट्रॉपिक्स व ओशनसॅट या उपग्रहांच्या मालिका, भारतीय सुदूर संवेदन, भारतीय राष्ट्रीय उपग्रह प्रणाली, भारतीय व्यापारी व नौदलाच्या बोटी यांच्यावरील खास उपकरणांनी घेतलेल्या निरीक्षणांच्या नोंदी तसेच देशातील भूकंप निरीक्षण केंद्रांच्या भूकंपांच्या नोंदी इत्यादी भारतीय हवामानशास्त्र विभागाकडे त्यांच्या नेटवर्कद्वारे येतात. यांचा उपयोग हवामानाच्या पूर्वानुम ानासाठी केला जातो.

भारतीय उष्णदेशीय हवामानशास्त्र संस्था, राष्ट्रीय मध्यम कालावधी हवामान पूर्वानुमान केंद्र आणि राष्ट्रीय महासागर तंत्रज्ञान संस्था इत्यादी संस्थांबरोबर अनेक प्रकल्पांमध्ये भारतीय हवामानशास्त्र विभागाचा सहयोग असतो. स्वत: नियोजन केलेले व कार्यरत ठेवलेले उपग्रह असणारा भारतीय हवामानशास्त्र विभाग हा विकसनशील देशांमधील हवामानशास्त्र संस्थांमध्ये पहिला आहे.

# कोकण विभागास्तरीय स्पर्धांमध्ये पनवेल महानगरपालिकेचे घवघवीत यश

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२१, पनवेल :** नगरपरिषद प्रशासन संचालनालय अंतर्गत कोकण विभागास्तरीय घेण्यात आलेल्या क्रिकेट, तीन किलोमीटर चालणे, गोळा फेक, १०० मीटर, कबड्डी, भालाफ ेक, लांब उडी, ४०० मी. धावणे, व्हॉलीबॉल, रिले १००४, रस्सीखेच अशा विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या सर्व स्पर्धांमध्ये म हानगरपालिकेने घवघवीत यश मिळविले.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय अंतर्गत कोकण विभागास्तरीय किक्रेट सामन्यात पनवेल महानगरपालिकेने सहभाग घेतला होता. आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पमपा सहायुक्त स्वरूप खारगे व विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील यांच्या नेतृत्वाखाली अंतिम सामन्यात ठाणे जिल्हा संघास पराभूत करून पमपा संघ विजयी ठरला. सदर क्रिकेट सामन्यात पनवेल महानगरपालिकेचे विश्वास पाटील, प्रतिक पाटील यांचे उत्कृष्ट फलदांजीमध्ये योगदान लाभले व जीवन मेंडे, विशाल म्हात्रे यांचे उत्कृष्ट गोलंदाजीम ध्ये योगदान लाभले.



या कोकण विभागीय स्पर्धामध्ये पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभाग विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन अद्वितीय यश मिळविले.

**यामध्ये...**

१) ३ कि.मी चालणे : प्रथम क्रमांक विनय निकम - चा.यंत्रचालक, द्वितीय क्र. - संदीप पाटील - उप अग्निशमन अधिकारी,

२) गोळा फेक : प्रथम क्रमांक - कष्णा नरवटे - यंत्रचालक

३) भ्रालाफेक : प्रथम क्रमांक - संदीप शिंदे - अग्निशामक

४) लांब उडी : प्रथम क्र. - समाधान आव्हाड

५) रिले १००÷४ धावणे : प्रथम क्र.- आकाश नलवडे- चा.यंत्रचालक, अमोल जाधव अग्निशामक, विनय निकम यंत्रचालक, चेतन बागूल अग्निशामक

६) रिले ४००÷४ धावणे : प्रथम क्र.- आकाश नलवडे यंत्रचालक, अमोल जाधव अग्निशामक, विनय निकम यंत्रचालक, चेतन बागूल- अग्निशामक

७) जलतरण : प्रथम क्रमांक गौरव राउत अग्निशामक

८) कबड्डी टीम : द्वितीय क्रमांक

९) हॉलीबॉल टीम : प्रथम क्रमांक

अग्निशमन विभागातील महिला कर्मचाऱ्यांनी देखील विविध स्पर्धांमध्ये यश मिळविले.

**यामध्ये...**

१) गोळा फेक : प्रथम क्रमांक - शुभांगी घुले, द्वितीय क्रमांक - पल्लवी जागले, तृतीय क्रमांक - संचिता विचारे.

२) भालाफेक : द्वितीय क्रमांक - शुभांगी घुले

तुतीय क्रमांक - सोनल गेंगजे

३) लांब उडी : तृतीय क्रमांक - संचिता विचारे

४) दोनशे मीटर धावणे : तृतीय क्र. - तेजश्री साळुंखे

५) चारशे मीटर धावणे : द्वितीय क्रमांक - सानीध्या पाटील

६) थाळीफेक : द्वितीय क्रमांक - शुभांगी घुले

७) बॅडमिंटन : द्वितीय क्रमांक - पल्लवी जागले

रस्सीखेच स्पर्धेमध्येदेखील अग्निशमन विभागातील महिला कर्मचाऱ्यांनी प्रथम क्रमांक मिळवून महापालिकेला घवघवीत यश मिळवून दिले.

# आता धुसफूस - रुसवेफुगवे 'पालकमंत्री' पदावरून...

२३ नोव्हेंबर निवडणूकीचे निकाल लागले, महायुतीला छप्पर फाडके बहुमत मिळाले मात्र सरकार स्थापन होण्यास बराच कालावधी गेला, भाजपचा विधिमंडळ नेता ठरेना, अखेर तो ठरला आणि तो ' पुन्हा आला'. सोबतीला दोन ऊपमुख्यमंत्री घेऊन शपथविधी पार पडला, मात्र कुणाचे किती मंत्री ते ठरेना कि खाते वाटप ठरेना. अगदी हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर ३९ मंत्र्यांचा शपथविधी पार पडला आणि तीनही पक्षात नाराजी जगजाहीर होऊ लागली. ऐकनाथ शिंदे दरेगाव ला जाऊन बसले. भाजपने सुधीर मुनगंटीवार यांना तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजितदादांनी छगन भुजबळ यांना कात्रजचा घाट दाखवला त्याच बरोबर शिंदे च्या सेनेने देखील तानाजी सावंत, दीपक केसरकर, अब्दुल सत्तार यांना' नारळ 'दिला. गुडघ्याला बाशिंग बांधून, कोट शिवुन शपथविधीचा फोन येईल या प्रतिक्षेत अनेकजण होते मात्र काहींचा हिरमोड झाला आणि मनातले मांडे मनातच राहिले. जनतेच्या मनातील ताईंनी योग्य वेळी 'भाऊं' शी जुळवून घेतले म्हणून मंत्रीपद पदरी पडले अन्यथा त्यांच नाराजी गेल्या पाच वर्षांत अनेकदा जगजाहीर झाली होती. ज्यांना मंत्रीपद मिळाले नाही त्यापैकी काहींना अधिवेशन सुरू असतांना देखील घरचा रस्ता धरला, कोणी आपला डीपी बदलला तर कोणी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली, तर कोणी 'जहाँ नही चैना वहाँ... म्हणत आपली नाराजी व्यक्त केली, आजही ते आपल्या नेत्याशी अबोला धरुन आहेत. आपल्या मुलीचे मंत्रीपद हूकले म्हणून मी मुख्यमंत्री असतो तर नांदेडला प्रतिनिधीत्व मिळाले असते अशी नाराजी अशोक चव्हाण यांनी व्यक्त केली. अधिवेशन काळात सर्वच मंत्री बिनखात्याचे राहिले आणि अधिवेशन संपताच खातेवाटप जाहिर झाले, पुन्हा एकदा खातेवाटपा वरून नाराजी नाट्य रंगले. सत्तापदाचा खिरापत सगळ्यांना मिळावी यासाठी आता अडीच अडीच वर्षाची चर्चा होत आहे,अडीच वर्षाच्या कालावधीत करणार तरी काय? पहिले सहा-सात महिने सत्कार समारंभात जातील, खात्याचा अभ्यास करणार कधी, योजना, धोरण आखणार कधी, अंमलबजावणी करणार कधी? सगळेच प्रश्न अनुत्तरित.

कसेबसे खातेवाटप झाले, मात्र पालकमंत्री ठरेना, अखेर प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूम ीवर दोन दिवसापूर्वी पालकमंत्री पदाचे वाटप झाले आणि पुन्हा एकदा महायुती मधील नाराजी नाट्य चव्हाटय़ावर आले.प्रत्येक काम ासाठी मंत्र्यालयात यावे लागु नये म्हणुन तसेच जिल्हाचा विकास आराखड, कामांचे नियोजन व्हावे यासाठी पालकमंत्री ही व्यवस्था निर्माण करण्यात आली. राज्याच्या मुख्यमंत्री प्रमाणेच पालकमंत्री हा जिल्ह्याचा मुख्यमंत्री ठरतो आणि सर्व निर्णय घेण्याचे अधिकार, निधी मंजुरी, निधी वाटप म्हणजेच अर्थकारणाच्या चाव्या त्याच्या ताब्यात असतात मात्र राज्यकर्ते मग ते कोणत्याही पक्षाचे असोत त्यांना पारदर्शकतेचे वावडे असते आणि लोकशाहीच्या नावाखाली एकाधिकारशाही राबवायची असते ते जिल्हा - जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या कार्यपद्धतीवरून दिसते म्हणुनच तर अजुनही पालकमंत्री सगळ्यांचाच अट्टाहास असतो. रायगडचे पालकमंत्री पद आपल्यालाच मिळेल असा विश्वास असणाऱ्या भरत गोगावलेंना पालकमंत्री पद मिळाले नाही तर पुन्हा एकदा आदिती तटकरे रायगडच्या पालकमंत्री झाल्या आणि रायगडमधे राडा सुरू झाला तर दादा भुसे आणि शिवसेनेच्या मंत्र्यांना पालकमंत्री पद मिळाले नाही म्हणून मंत्री गुलाबराव पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. अखेर घाईघाईत नाशिक आणि रायगड जिल्हा पालकमंत्री पदाला स्थगिती द्यावी लागली.बीड ऐवजी जालन्याचे पालकमंत्री पद मिळाल्याची खंत पंकजा मुंडे यांनी बोलून दाखविली. त्यातच ऊपमुख्यमंत्री ऐकनाथ शिंदे पुन्हा एकदा दरेगाव ला जाऊन बसले. पालकमंत्री गिरीश म हाजन यांच्या अभिनंदनाचे फलक नाशिक मधे लागले होते. तिकडे कोल्हापूर चे हसन मुश्रीफ देखील नाराज आहेत. सत्तेचा वाटा सगळ्यांना मिळावा म्हणून काहींना सह पालकमंत्री केले गेले, हे पहिल्यांदाच घडले. मंत्रीपद, खाते, पालकमंत्री यासाठी महायुती सरकार मधील रुसवेफुगवे, वादविवाद, तु-तु-मै-मै महायुती सरकारमध्ये वारंवार चव्हाटय़ावर येत आहेत. एवढ्या वरून धुसफूस थांबत नसेल तर सहपालक, ऊप पालकमंत्री पदे निर्माण करुन सर्वांची सोय लावा.या सगळ्यात जनतेचे हित कुठे आहे?

सत्तापद, आमदारकी, खासदारकी, मंत्रीपदे आपल्या कुटुंबातच रहावी ज्यामधे सर्व पक्षीय नेत्यांचे एकमत होते हे विशेष. राजकारण हे सम ाजसेवेचे पवित्र माध्यम राहिले नसुन अधिकार गाजवणे, पैसा कमावण्यासाठी सत्तापदे, मंत्रीपदे हवी असतात हे अनेकदा अधोरेखित झाले आहे, आजवर हजारो लोकप्रतिनिधीं मंत्री झाले मात्र त्यापैकी कितीजणांनी निस्वार्थीपणे, निष्पक्षपातीपणे, निर्भीडपणे आपले कर्तव्य पार पाडले आणि आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे हा संशोधनाचा विषय आहे. काही बोटावर मोजता येतील इतक्या जणांनीच जनहितासाठी आपले मंत्रीपद सत्कारणी लावले आहे. वर्षानुवर्षे मंत्रीपद, सत्तापदे मिळाली कोणालाही मंत्रीपदाचा मोह सुटत नाही,तरी देखील मंत्रीपदाचा अट्टाहास प्रत्येकजण करत आहे. राजकारणात कधीही काहीही होऊ शकते, कोणाचा 'ऊदय' किंवा कोणाचा 'अस्त' केव्हा होईल काहीच सांगता येत नाही. सगळ्यांनाच मंत्री व्हायचे असते एवढे मंत्रीपद, पालकमंत्री पदात आहे तरी काय?.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## भूक रोपटे..

नवी कुटुंब व्यवस्था
स्वयंपाक घरटे छोटे
उदर भरणं हे केवळ
भरायची तुडुंब पोटे

स्विगी झोमॅटो वरती
वाट्टेलं ते पदार्थ भेटे
जो जे मागेलं मिळेलं
साक्षातअन्नपूर्णा वाटे

खाऊगल्लयासजल्या
टप-या टुप-यांही दाटे
चमचमीत मसालेदार
खवैय्ये जिभल्याचाटे

हॉटेलस् सज्ज सर्वत्र
सर्वास्तव लहानमोठे
यक्षप्रश्न सतावेनेहमी
यंदा जायचे हो कोठे

खायला पर्यायअनेक
भलेअसो एकटेदुकटे
सहकुटुंब खुशाल जा
सोबत दो तीन फुकटे

अन्नासाठी वणवणती
झोपडपट्टीमधलीपोट्टे
उकिरड्या वरती गर्दी
पक्वान्न खायला उष्टे

एकिकडेतुडुंबलीभूक
पोटांची झाली खापटे
रे उपाशी झोप येईना
आईकाळजीस थापटे

कु पोषीत माय माती
उन्मळून पडले रोपटे
भूक बदलते भविष्या
फुलण्याआधीचं उपटे

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

## वाचक पत्र

### बांगलादेशी घुसखोरांचा बंदोबस्त केव्हा करणार?

बहुचर्चित सैफ अली खान हल्ला प्रकरणाचा छडा लावण्यात मुंबई पोलिसांना अखेर यश आले असून मोहम्मद शरीफूल इस्लाम शहेजाद या आरोपीला पोलिसांनी ठाण्यातून अटक केली आहे. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून चोरीच्या उद्देशानेच तो सैफच्या घरात शिरला होता. सदर आरोपी भारतीय असल्याचा कोणताच पुरावा त्याच्याकडे नसल्याने तो बांगलादेशी असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली होती. तो बांगलादेशमध्ये राष्ट्रीय पातळीवरील कुस्ती खेळाडू असल्याची माहितीही आरोपीने पोलिसांकडे दिली आहे; मात्र आरोपीच्या वकिलांनी आरोपी बांगलादेशी नसल्याचे सांगितले आहे. सदर आरोपी मुंबईल बनावट कागदपत्रे बनवून बिजॉय दास नावाने वावरत होता. याच बनावट कागदपत्रांच्या आधारावर त्याने एका हाऊसकिपींग कंपनीत नोकरीं मिळवली होती. आरोपी बांगलादेशी नसल्याचे त्याच्या वकिलांचे म्हणणे असले, तरी पोलिसांनी तो बांगलादेशीच असल्याचे सिद्ध केले आहे. सदर बाब ही अत्यंत गंभीर असून असे किती बांगलादेशी बनावट कागदपत्रे बनवून आणि हिंदु नाव धारण करून भारतात राहात असतील. आजमितीला बांगलादेशात हिंदूंना वेचून मारले जात आहे, हिंदु माता भगिनींवर अत्याचार केले जात आहेत, हिंदूंची दुकाने, कार्यालये जाळली जात आहेत, मंदिरे फोडली जात आहेत, दुसरीकडे भारतात कोट्यवधी बांगलादेशी बनावट कागदपत्रे बनवून राहात आहेत. हिंदु नावे धारण करून नोकऱ्या मिळवत आहेत, येथील हिंदु मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांना गैरमार्गाला लावत आहेत. आज अनेक अनैतिक धंद्यांमध्ये, चोरी, दरोडे, अमली पदार्थांची तस्करी, अपहरण, खून यांसारख्या गुन्ह्यांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून येत आहे. हिंदु नाव धारण करून वावरणारी ही मंडळी भविष्यात हिंदूंच्या धार्मिक उत्सवांत सहभागी होऊन दहशतवादी कृत्य करू शकतात. देशाच्या अंतर्गत सुरक्षेला हानिकारक असलेल्या या बांगलादेशी घुसखोरांच्या विरोधात आणि त्यांना बनावट कागदपत्रे बनवून देणाऱ्या, त्यांच्या खाण्या पिण्याची आणि आश्रयाची सोय करणाऱ्या येथील देशद्रोह्यांच्या विरोधात सरकार काही ठोस उपाय करणार आहे की नाही.

**- सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बांगलादेशिंची शोध मोहीम; टिळक नगर पोलीस ॲक्शन मोडवर



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२१, डोंबिवली (ठाणे) :** बांगलादेशी नागरिक कल्याण डोंबिवली परिसरामध्ये वास्तव्य असल्याची माहिती मिळत असल्याने सध्या पोलीस उपायुक्त परिमंडळ ०३ अंतर्गत असलेले पोलीस कसून चौकशी करत आहे. सध्याची परिस्थिती बघत डोंबिवली पूर्व टिळक नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांनी कंबर कसली असून दि.२१ जानेवारी २०२५ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांनी सकाळपासून बांगलादेशी शोध मोहीम राबवून कचोरे गाव या ठिकाणी आपल्या फौज फाट्यासह स्वतः चौकशी करून कारवाई करण्यासाठी गेले आहेत. या कारवाईमध्ये टिळक नगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जगन्नाथ शिंदे,पोलीस उपनिरीक्षक तेजल पवार,पोलीस हवालदार संजय पानसरे पोलीस शिपाई उमेश राठोड आणि पोलीस शिपाई तुषार कमोदकर आपल्या वरिष्ठांचें मार्गदर्शन खाली या मोहिमेत सहभागी होते. ही मोहीम सतत पुढेही चालू राहणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कुमार कदम यांनी सांगितले आहे. या कारवाईचे त्या ठिकाणी जमलेल्या नागरिकांनी कौतुक व्यक्त केले.

## महाराष्ट्र पॉलिटेक्निक शेनाळे येथे अतिथी व्याख्यानमालेचे आयोजन

**अक्षरात : उमेश तबीब**

**दि.२१, रत्नागिरी (कोकण) :** दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र पॉलिटेक्निक येथे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालाचे प्रमुख व्याख्याता म्हणून प्रोफेसर ऋषिकेश भावे (असिस्टंट प्रोफेसर ऑफ मेकॅनिकल इंजिनिअरिंग कॉलेज वेळणेश्वर) येथून आले होते व त्यांनी इंजीनियरिंग कॉलेजमधील सध्याची गरज लक्षात घेऊन इमर्जिंग ट्रेंड्स इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयावर व्याख्यान दिले. त्याचप्रमाणे प्रोफेसर गजानन खापरे (असिस्टंट प्रोफेसर ऑफ इलेक्ट्रॉनिक अँड कॉम्प्युटर इंजीनियरिंग व्हीपीएम कॉलेज वेळणेश्वर) हे सुद्धा उपस्थित होते. सध्याची तंत्रशिक्षणामधील गरज व आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा विषय लक्षात घेऊन त्यांनी सायबर सेक्युरिटी या विषयावरती व्याख्यान दिले.

या संपूर्ण व्याख्यानमालेमध्ये महाराष्ट्र पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवून भरघोस प्रतिसाद दिला. सध्या तंत्र शिक्षण व इंजीनियरिंगची आधुनिक गरज लक्षात घेता हे दोन्ही ही व्याख्यानमाला विद्यार्थ्यांसाठी खूपच महत्त्वाचे होते. त्यामुळे त्यांना शैक्षणिक तसेच पुढील करिअर साठी खूप महत्त्वाचे ठरेल. या व्याख्यानमालाचे नियोजन महाविद्यालयातील सर्व विभागातील विभाग प्रमुखांनी केली होती. त्यामुळे व्याख्यानमालेचे कार्यक्रम खूप चांगल्या प्रकारे संपन्न झाले. यासाठी महाराष्ट्र पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण ढंग यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## अवैध धंद्याला स्थानिक पोलिसांची मदत ग्रामस्थांमध्ये चर्चा




**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२१, उदगीर (लातूर) :** उदगीर येथे दारूच्या अवैध धंद्यामुळे येथील ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरी स्थानिक पोलिसांची कार्यवाही म्हणजे तू कर मारल्यासारखं आणि मी करतो रडल्यासारखं असेच असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये ऐकाव्यास मिळत आहे. सविस्तर वृत्त असे की, वाढवणा पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध धंद्यांनी धमकूळ घातला आहे. वाढवणा हद्दीत मोठे गाव असलेले हळी - हंडरगुळी गुडसूर व तीर्थक्षेत्र असलेले डोंगरशेळकी तांडा या गावांमध्ये मटका देशी- विदेशी दारू मोठ्या प्रमाणात विक्री केली जात आहे. यामुळे गावांमध्ये गोरगरीब कुटुंब उध्वस्त होत आहेत. दिवसभर काबाडकष्ट करायचे आणि आलेला पैसा दारू व मटक्यामध्ये जात असल्यामुळे त्या कुटुंबातील इतर सदस्यांना उपाशी पोटी झोपण्याची वेळ येत आहे. याबाबतीत पोलिसांकडे तक्रार केल्यास त्याचा काहीही फायदा होत नाही. कारण ही कार्यवाही म्हणजे तू कर मारल्यासारखे आणि मी करतो रडल्यासारखं अशीच कार्यवाही होते. पोलिसांची कार्यवाही झाल्यानंतर काही तासातच दारूची दुकान जैसे थे चालू होतात. पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती घेण्यासाठी स्थानिक पत्रकारांनी येथील बीट अंमलदाराशी दूरध्वनीवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी फोन घेतला नाही. त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यास टाळाटाळ करत आहेत .वरिष्ठांनी लक्ष घालून वाढवणा हद्दीत चालू असलेले अवैध्य धंदे बंद करावेत. अशी मागणी या भागातील ग्रामस्थ करत आहेत.

## दिव्यातील साबे गावातील पाणी प्रश्न न सोडल्यास भाजपाचे ठिय्या आंदोलन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२१, दिवा (ठाणे) :** दिव्यातील शहरात ४० एम.एल.डी. पाणीपुरवठा होऊन देखील पाणी प्रश्न सुटता सुटेल अशी परिस्थिती ओढवली आहे. दिव्यातील रहिवासी विकतचे पाणी घेऊन मेरकुटीला आला आहे नक्की पाणी मुरतंय कुंठे? हा प्रश्न निर्माण झाला आहे. दिवा साबेगाव परिसरातील भगतवाडी, साळवी नगर, केदार पाटील चाळ, गणेश मंदिर परिसर, राधे कृष्ण सोसायटी तसेच त्यांच्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना अनेक वर्षापासून पाण्याच्या भीषण टंचाईला सामना करावा लागत आहे. अनेक वेळा महानगरपालिकेला तक्रार व निवेदन देऊन सुद्धा ठाणे महानगरपालिका दुर्लक्ष करत आहे. पाणी बिल मात्र नियमितरित्या न चुकता नागरिकांना पोचवले जाते. टँकरचे पाणी विकत घेऊन त्यांच्या मासिक खर्चावर अतिरिक्त भार नागरिकांना सहन करावा लागत आहे. पाणी प्रश्नाची गंभीर दखल घेत भारतीय जनता पार्टीच्या वतीने मंगळवार, दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी निवेदन देऊन येत्या १० दिवसामध्ये साबेगांव परिसरातील पाणी प्रश्न दिवा प्रभाग समितीच्या वतीने सोडवला नाही तर पर्यायी साबे गावातील सर्व रहिवाशांना सोबत घेऊन भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने दिवा प्रभाग समिती समोर ठिय्या आंदोलन केले जाईल. असा आणि निर्वाणीचा इशारा दिवा भाजप मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी दिला आहे. या प्रसंगी भाजपचे नरेश पवार, विजय भोईर, अशोक पाटील, गणेश भगत, रोशन भगत, विनोद भगत, मधुकर पाटील, नितीन कोरगांवकर, आदि पदाधिकारी व महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## 'सुपर स्वच्छ लीग' कॅटेगरीत देशातील ३ शहरांमध्ये नवी मुंबईचा समावेश

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षणामध्ये सातत्याने आपले मानांकन उंचावणारे शहर म्हणून नवी मुंबई शहर नावाजले जाते. 'स्वच्छ सर्वेक्षण २०२३' मध्येही देशातील द्वितीय क्रमांकाचे (तांत्रिकदृष्ट्या तृतीय) स्वच्छ शहर म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेस मानांकन लाभले आहे. त्याचप्रमाणे कचरामुक्त शहराचे सर्वोच्च 'सेव्हन स्टार' रेटिंग आणि ओडीएफ कॅटेगरीमध्ये सर्वोच्च 'वॉटर प्लस' रेटिंग देखील नवी मुंबई महानगरपालिकेने प्राप्त केलेले आहे. या अनुषंगाने 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' चे टूलकिट प्रकाशित करताना शहरी विकास मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' करिता आजवरच्या स्वच्छ सर्वेक्षणात सातत्याने अग्रक्रमावर राहिलेल्या उच्चत्तम शहरांकरिता 'सुपर स्वच्छ लीग' ही नवीन विशेष कॅटेगरी निर्माण करीत असल्याची घोषणा केली.

यामध्ये लोकसंख्येच्या आधारावर शहरांच्या पाच श्रेणी निवडण्यात आल्या. त्यामधील १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येच्या देशातील प्रमुख शहरांच्या मुख्य गटात ३ शहरांचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये नवी मुंबई हे महाराष्ट्रातील एकमेव शहर आहे. या 'सुपर स्वच्छ लीग' गटामध्ये महाराष्ट्रातील नवी मुंबई, मध्य प्रदेशातील इंदोर आणि गुजरातमधील सुरत या ३ शहरांचा समावेश आहे. या ३शहरांनी सातत्याने स्वच्छतेमध्ये अग्रक्रम राखला असून त्यांची स्वतंत्र कॅटेगरी निर्माण करण्यात आली आहे. नवी मुंबईकर नागरिकांच्या दृष्टीने ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट असून या यशस्वी मानांकना बद्दल महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व नागरिकांचे अभिनंदन केले आहे.नवी मुंबईचा स्वच्छ सर्वेक्षणातील 'सुपर स्वच्छ लीग' या नव्याने निर्माण केलेल्या विशेष गटात समावेश होणे ही आनंदाची गोष्ट आहेच, त्यासोबतच आपल्या सर्वांची जबाबदारी वाढवणारी बाब असून यापुढील काळात आपले स्थान उंचावत ठेवण्यासाठी सर्व नागरिकांचा शहर स्वच्छतेत अधिक आत्मियतेने व सक्रियतेने सहभाग आवश्यक



असल्याचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले आहे.नवी मुंबईकर नागरिक नेहमीच स्वच्छता कार्यात अग्रेसर राहिले असून येथील स्वच्छतेबाबत वेळोवेळी दाखवलेली जागरूकता शहराच्या नावलौकिकात भर घालणारी राहिली आहे. त्यामुळे 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष गटात समावेश झाल्यानंतर अधिक जागरुकतेने स्वच्छता वाढीवर भर देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

सुपर लीगमध्ये समावेश झाल्याने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये गुणांकनाचे स्वरुप बदलले असून आता १० हजार गुणांचे मूल्यमापन आहे. त्या गुणांच्या वर्गवारीमध्ये प्रत्यक्ष दर्शनी स्वच्छतेला १५०० गुण, घन कचऱ्यावरील शास्त्रोक्त प्रक्रियेकरिता १५०० गुण तसेच जनजागृती उपक्रमांकरिता १५०० गुण असणार आहेत. त्याचप्रमाणे वर्गीकृत कचरा संकलनाकरिता १००० गुण, शौचालय व्यवस्थापना करिता १००० गुण, सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पुनर्उपयोगाकरिता १००० गुण व माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन कचरा व्यवस्थापन सुधारणेकरिता १००० गुण असणार आहेत. तसेच लोकांकडून प्राप्त तक्रार निवारणासाठी ५०० गुण, मलनि:स्सारण प्रक्रियेकरिता ५०० गुण आणि स्वच्छताकर्मी करिता कल्याणकारी कामांसाठी ५०० गुण अशाप्रकारे एकूण १०,००० गुणांनुसार सर्वेक्षण केले जाणार आहे. याशिवाय कचरामुक्त शहर मानांकनाकरिता २५०० गुण व ओडीएफ वॉटर प्लस मानांकनाकरिता २५०० गुण ग्राह्य धरले जाणार आहे. या सर्वेक्षणामध्ये शालेय स्वच्छतेवर विशेष लक्ष दिले जाणार असून स्वच्छ आणि कचरामुक्त शाळा, शाळांमधील कचरा वर्गीकरण आणि कंपोस्ट पीट्सचा वापर, विद्यार्थी व विद्यार्थिनीं साठी स्वतंत्र स्वच्छतागृह व्यवस्था अशा विविध बाबींची बारकाईने पाहणी करण्यात येणार आहे. शहरातील पर्यटन स्थळे, स्मारके व परिसर स्वच्छता या बाबीही महत्वाच्या आहेत.

शहर स्वच्छतेविषयी नागरिकांच्या अभिप्रायाकरिता विविध माध्यमांचा वापर केला जाणार असून प्रत्यक्ष 'संवाद, स्वच्छता ॲप, माय गर्व्हमेंट ॲप, वोट फॉर माय सिटी ॲप आणि वोट फॉर माय सिटी पोर्टल' अशी ५ माध्यमे सर्वेक्षणातील नागरिक प्रतिसादाकरिता १५ फेब्रुवारी नंतर उपयोगात आणली जाणार आहे. या अनुषंगाने सर्व अधिकारी, कर्मचारीवृंद यांनी 'निश्चय केला, नंबर पहिला' हे ध्येय साध्य करण्यासाठी संपूर्ण क्षमतेने सक्रिय व्हावे असे सूचित करीत महापालिका डॉ. कैलास शिंदे यांनी स्वच्छ सर्वेक्षणातील सुपरस्वच्छ लीग मधील आपला प्रवेश ही आपल्या आजवरच्या कार्याची पोचपावती असून हे मानांकन उंचावण्यासाठी नियोजनबध्द कृती आराखड्यानुसार आपल्याला सोपविलेल्या जबाबदारीनुसार मुद्देनिहाय काम करावे असे आढावा बैठक घेत निर्देश दिले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड व सर्व विभागप्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता उपस्थित होते.स्वच्छतेमधील नवी मुंबईच्या आजवरच्या मानांकनात नवी मुंबईतील लोकप्रतिनिधी, विविध संस्था, संघटना, मंडळे, शाळा - महाविद्यालये, ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, दिव्यांग, तृतीयपंथी नागरिक तसेच प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी व सर्वच नागरिक अशा विविध समाज घटकांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. दैनंदिन शहर स्वच्छ ठेवणारे स्वच्छतामित्र व स्वच्छतासखी तसेच सफाईमित्र यांचे सर्वाधिक योगदान या मानांकनात आहे. या सर्वांचे अभिनंदन करीत यापुढील काळात शहराचे मानांकन उंचावण्यासाठी अधिक जोमाने काम करूया असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केले आहे.

## ठाणे बोरिवली अंतर फक्त १२ मिनिटात...?; बहुप्रतिक्षित प्रकल्पाचा मार्ग अखेर मोकळा..!

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२१, ठाणे :** मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील प्रवास आणखी सुकर व्हावा यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्यातीलच एक प्रकल्प म्हणजे ठाणे-बोरीवली दुहेरी बोगदा. आता या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पासाठी बोरीवली बाजूकडील उर्वरित ३.६५८ चौ.मी जागा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने एमएमआरडीएकडे हस्तांतरीत केली आहे. त्यामुळं या प्रकल्पातील अडथळे दूर झाले आहेत. आता लवकरच या प्रकल्पाचे काम सुरू होणार आहे.

ठाणे-बोरीवली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून ११.८५ किमी लांबीच्या मार्गाची उभारणी करण्यात येत आहे. या मार्गावर १०.२५ किमी लांबीच्या बोगद्याचा समावेश आहे. नॅशनल पार्कच्या पोटातून हे दोन बोगदे जाणार आहेत. जून २०२३मध्ये या प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले आहेत. या बोगद्यामुळं घोडबंदर रोडची वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

सध्या या प्रकल्पाचे ठाण्याच्या बाजूकडील काम सुरू झाले आहे. तसंच, बोगद्याच्या भुयारीकरणासाठी शाफ्ट उभारणीचे काम सुरू केले आहे. मात्र याचबरोबर बोरिवली बाजूकडील भुयारीकरणापूर्वीची प्राथमिक कामेही सुरू झालेली नाहीत. या प्रकल्पासाठी १८,८३८ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

दरम्यान ठाणे ते बोरीवली दरम्यानचा प्रवास वेगवान व्हावा यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. एमएमआरडीए ठाणे- बोरीवली दरम्यान दुहेरी बोगदा बांधणार आहे. सध्या ठाण्याहून बोरीवलीला जाण्यासाठी एक ते दीड तासांचा वेळ लागतो. तसंच, कधी कधी वाहतूक कोंडीचा सामनादेखील करावा लागतो. मात्र, या प्रकल्पामुळं हा प्रवास अगदी १० मिनिटांवर येणार आहे. बोगद्याच्या दोन्ही बाजूस २-२ मार्गिकांसह आपत्कालीन मार्ग आहे. प्रत्येकी ३०० मीटर पादचारी क्रॉस पॅसेज आणि प्रत्येकी २ पादचारी क्रॉस पॅसेजनंतर वाहन क्रॉस पॅसेजची तरतूद करण्यात येणार आहे.



संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांतर्गत ठाणे आणि बोरिवली दरम्यान प्रस्तावित ११.८ कि.मी. लांबीचा दुहेरी बोगदा हा भारतातील शहरी भागांतर्गत सर्वात लांब बोगद्यांपैकी एक असेल. मूळ बोगद्याची एकूण लांबी १०.२५ किमी असेल. हा ठाण्याच्या बाजूने सुरू होऊन बोरीवली येथे छक्८ वर संपतो. ठाणे-बोरीवली या थेट जोडणीमुळे घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडी कमी होईल तसेच वायू आणि ध्वनी प्रदूषण कमी होण्यास मदत होऊन संबंधित क्षेत्राच्या वाढीस चालना मिळेल. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे पर्यावरण घटकांचे संरक्षण करण्यासाठी सर्वोत्तम तंत्रज्ञानाचा वापर करुन या प्रकल्पाचे बांधकाम करणे प्रयोजित आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर बोरिवली ते ठाणे अंतर १२ मिनिटांत पूर्ण पार करणे शक्य होईल. तसेच, सुमारे १ लाख नागरिकांचा प्रवास त्रासमुक्त होईल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे १,५०,००० मेट्रिक टन प्रति वर्ष कार्बन उत्सर्जनात घट होऊन सुमारे १,००,००० झउणी या भूमिगत बोगद्याचा वापर करतील. सदर प्रकल्पातील बोगद्याचा भाग हा संरक्षित वन क्षेत्रातुन जात असल्याने अत्याधुनिक टनेल बोरिंग मशीन्सच्या सहाय्याने बोगद्याचे खोदकाम करण्यात येणार आहे.

## नमन मंडळ व कलाकारांसाठी २४ जानेवारी रोजी सभेचे आयोजन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२१, गुहागर (रत्नागिरी) :** कोकणातील नमन लोककला व लोककलावंतांच्या न्याय हक्कासाठी शासन दरबारी प्रखरपणे लढा देत शासन स्तरावर नमन महोत्सव सुरू करायला भाग पाडणारी महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था अर्थात नमन लोककला संस्था कार्यक्षेत्र अखंड भारत ह्या संस्थेने नमन ह्या लोककलेला राजमान्यता मिळण्याबरोबरच, कलाकारांना शासनाच्या लोक कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संस्थेने गतिशील कार्यपद्धतीचेधोरण आखले असून त्याच अनुषंगाने नमन लोककला संस्थेच्या वतीने शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण या ठिकाणी संस्थेचे विद्यमान अध्यक्ष रवींद्र मटकर यांच्या अध्यक्षतेखाली




सभेचे आयोजन करण्यात आले असून सदर सभेस उपरोक्त संस्थेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती तसेच संस्थेच्या वतीने शासन दरबारी केलेल्या मागण्या आणि त्यातून सर्वांच्या सहकार्याने मिळालेले यश तसेच संस्थेची पुढील वाटचाल यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार असून ज्या ज्या तालुक्यात संस्थेची शाखा बांधणी बाकी आहे. तिथे शाखा बांधणी करण्यात येणार असून सदर सभेत शाखेची विधीवत निर्मीती करून पदाधिकारी निवड करण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे, सभेचे ठिकाण आणि वेळ पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

सकाळी- १० वाजता, तालुका रत्नागिरी: गारवा हॉटेल ,जाकादेवी (रत्नागिरी)

दुपारी- ०३ वाजता, तालुका संगमेश्वर: जेष्ठ नागरिक संघ सभागृह,(भुवड कॉलनी,महालक्ष्मी गॅस एजन्सीच्या पुढे) देवरुख कॉलेज रोड, देवरूख

सायंकाळी- ०५ वाजता, तालुका चिपळूण: कन्या शाळा,पागझरी (चिपळूण तहसीलदार कार्यालयाच्या बाजूला) चिपळूण

सदर सभेला नमन मंडळ व त्यांचे प्रतिनिधी सह कलावंत यांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नमन लोककला संस्थेचे महासचिव शाहीद खेरटकर यांनी केले आहे.

## आश्रम शाळेतच विद्यार्थिनीचा विनयभंग

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२१, शहापूर :** १८ जानेवारी रोजी टाकीपठार आश्रम शाळेत इयत्ता अकरावीत शिकणारी विद्यार्थीनी लेझीम खेळून रूममध्ये आली असता त्या ठिकाणी आश्रम शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर जाधव यांनी विनयभंग केला असल्याची घटना घडली आहे.. घाबरलेल्या विद्यार्थिनीने आज दि.२१ रोजी तिच्या आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितला. तिच्या आई-वडिलांनी ताबडतोब किन्हवली पोलीस स्टेशन गाठत मुख्याध्यापक प्रभाकर जाधव यांच्या विरोधात विनयभंगाची तक्रार दाखल केली असून मुख्याध्यापक प्रभाकर जाधव याला किन्हवली पोलिसांनी अटक केली असल्याची माहिती अक्षराज मीडियाच्या हाती आली आहे.. अशे प्रकार या अगोदरही घडले आहेत का ? याची देखील चौकशी करत असल्याचे किन्हवली पोलिसांनी सांगितले.

# के.के.रेंज लष्करी प्रात्यक्षिकांची दणाणले; मॅकेनाइज इन्फंट्रीने दाखवली आपली सक्षमता

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** आकाशातून लक्ष्याच्या दिशेने झेपावणारे ड्रोन व लक्ष्यापासून काही अंतरावर आल्यावर त्यांच्याकडून होणार्या स्फोटकांच्या मार्याने उद्धवस्त होणारे लक्ष्य.अजस्त्र अशा भीष्म-अर्जुन व अजय या रणगाड्यांतून ज्वाळांचा लोळ पसरवत झेपावणार्या बॉम्बने ५ किलोमीटर अंतरावरील लक्ष्याच्या उडणार्या चिंधड्या.असा युध्द थरार लष्करी जवान, त्यांचे कुटुंबीय, देश व परदेशातून आलेल्या वरिष्ठ लष्करी अधिकार्यांनी सोमवार, दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी सकाळी केके रेंज युद्धसराव क्षेत्रावर अनुभवला. अचूक लक्ष्यभेदावर होणारा टाळ्यांचा कडकडाट वातावरणात उत्साह पसरवून गेला. यानिमित्ताने शस्त्रसज्ज व समृद्ध भारतीय लष्कराच्या ताकदीला दाद दिली गेली तसेच आधुनिक युध्द साधने व शस्त्रांचे दर्शन व माहितीही उपस्थितांनी घेतली.





अहिल्यानगरपासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर विळद घाटाच्या परिसरात के.के रेंज युद्धसराव क्षेत्र आहे. तेथे दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी सकाळी वार्षिक युद्ध सराव प्रात्यक्षिके झाली. येथील एसी सेंटर अँड स्कूल या लष्करी प्रशिक्षण केंद्राचे कमांडंट मेजर जनरल विक्रम वर्मा यांच्यासह नेपाळचे ब्रिगेडियर मनोज थापा यांच्यासह अमेरिका, बोस्निया, सौदी, नेपाळ या मित्र राष्ट्रांतील वरिष्ठ लष्करी अधिकारी यावेळी उपस्थित होते. मॅकेनाईज्ड इन्फ्रंट्रीने आपली सक्षमता प्रात्यक्षिकांतून दाखवली आहे व या प्रात्यक्षिकांत जवानांनी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करीत अचूक लक्ष्यभेद केल्याचे समाधान असल्याची भावना यावेळी कमांडंड मेजर जनरल वर्मा यांनी व्यक्त केली.

भल्या पहाटे केके रेंज युध्द सराव क्षेत्रावर दाखल झालेल्या उपस्थितांचे स्वागत एका दणदणीत स्फोटाने झाले. रणगाड्यातून डागला गेलेला तोफगोळा अचूक लक्ष्य भेद करत असल्याचे उपस्थितांनी पाहिले व डोळ्याचे पारणेच फिटले. टाळ्यांच्या जोरदार कडकडाट झाला. आणि त्यानंतर एकापाठोपाठ एक प्रात्यक्षिके रंगू लागली. अर्जून व भीष्म (टी ९०) ,अजय (टी ७२) या रणगाड्यांतील प्रशिक्षित लष्करी जवानांनी ८०० मिटर, दीड हजार मीटर, दोन हजार मिटर, तीन हजार मिटर व पाच हजार मिटरवरील लक्ष्यभेद केला. इनफंट्री कॉम्बॅक्ट व्हेईकल ( बीएमपी १ व बीएम पी २) सारस व बस्ट यांनीही प्रात्यक्षिके दाखवली. या दरम्यान उपस्थितांना प्रसिद्ध सुखोई विमानाचे दर्शन झाले. चिता हेलिकॉप्टरही प्रात्यक्षिकात सहभागी झाले होते. रेकी वॉरियर टँकरद्वारे शत्रूच्या क्षेत्राची टेहळणी व शत्रू स्थानाचा नाश करण्याचे वैशिष्ट्य दाखविले. प्रत्यक्ष युद्ध प्रात्यक्षिकातून शत्रू स्थानांना घेरणे व ते स्थान नष्ट करण्याचे ध्येय साध्य करण्याचे कौशल्य दाखवले गेले.

# थोडक्यात

## मांडवे खुर्द जि.प.शाळेत आनंदी बाजार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील मांडवे खुर्द येथील जि.प.प्राथमिक शाळेच्या आवारात सोमवार, दि.२० जानेवारी २०२५ रोजी बाल आनंद बाजार अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाला. तत्पूर्वी बाल आनंद बाजाराचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सरपंच व ग्रामपंचायतचे सर्व सदस्य यांनी केले. शाळेतील १ ली ते ७ वी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. शाळेतून विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांचें व्यवहारी ज्ञान ही वृध्दींगत व्हावे, शेतकरी म्हणून आपण जे पिकवतो ते विकताही आले पाहिजे. या उद्देशाने बाजारचे आयोजन करण्यात आले होते. या बाजारामध्ये मुलांनी सर्व प्रकारचा भाजीपाला, फळे, लेखन साहित्य, तसेच विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. गावकऱ्यांनी या बाजारातून भाजीपाला, फळे, खाद्यपदार्थ यांची खरेदी करत मुलांच्या या बाजारला चांगला प्रतिसाद दिला. व १४ हजार ६५० रुपयांची उलाढाल या बाजारात विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आली. खाऊंच्या स्टॉलला विशेष प्रतिसाद मिळाला. त्यात पाणीपुरी, समोसा, ढोकळा, इडली सांबर, ओली भेळ, स्पेशल चना मसाला, पोहे, खारे शेंगदाणे, तिळाचे लाडू, फुटाणे हे सर्वच पदार्थ मोठ्या प्रमाणावर विकले गेले व या पदार्थांचे ग्राहकांकडून विशेष कौतुकही केले. यावेळी केंद्रप्रमुख अनाप व ह.भ.प. कल्पकराज खामकर महाराज यांनी कार्यक्रम विषयीचा अभिप्राय दिला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावचे सरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ शा. व्य.समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, मुख्याध्यापक व सर्व शक्षक वृद्धांनी सहकार्य केले.

# विद्यादीप विद्यालय कोपरखैरणे यांचा वार्षिक सोहळा साजरा

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.२१, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** नुकताच विद्यादीप विद्यालय कोपरखैरणे व अँजल किडझी इंग्रजी माध्यम या शाळेचा जल्लोष २०२५ व वार्षिक बक्षीस वितरण, गुणगौरव सोहळा छत्रपती शिवाजी महाराज मैदान सेक्टर एक ते चार कोपरखैरणे नवी मुंबई या ठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेमार्फत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम साजरे केले जात असतात त्यातलाच एक म्हणजे जल्लोष २०२५ या जल्लोषचे उद्घाटन विधानपरिषद सदस्य नरेंद्र पाटील, माजी महापौर सुधाकर सोनवणे यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी लहान लहान बालकलाकारांनी प्रेक्षकांना आपल्या नृत्याची, नाचाची भुरळ पाडून जवळपास ३ तास जागेवर खिळवून ठेवले होते.

सामाजिक प्रबोधनावर आधारित रामायण नाट्य त्याचबरोबर लोकगीत, चित्रपट गीत, प्रादेशिक गीत, भारूड, आराधी गीत, हरियाणवी नृत्य, पंजाबी नृत्य, शिव गीत, शेतकरी नृत्य अशा विविध गाण्यांवर या बालकलाकारांनी ठेका धरला होता. यावेळी एंजेल किडझी च्या इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी धम्माल अशी इंग्रजी भाषेतील नृत्य सादर केली. कोणत्याही नृत्यदिग्दर्शकाविना फक्त विद्यार्थी आणि शिक्षकांच्या अथक प्रयत्नाने सर्व नृत्याचे सादरीकरण झाले. तसेच गतवर्षी इयत्ता दहावी मध्ये प्रथम ३ क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला.

त्याचबरोबर आंतरशालेय नृत्य महोत्सवात उत्तम कामगिरी करून तृतीय क्रमांक पटकावून शाळेचा गौरव वाढविल्याबद्दल इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांचा ट्रॉफी देऊन सत्कार विधानपरिषद सदस्य नरेंद्र पाटील, माजी महापौर सुधाकर सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आला. मंचावर माजी नगरसेविका सायली शिंदे, भारती पाटील, मेघाली राऊत, दमयंती आचरे, संगीता म्हात्रे, उद्योगपती मेरुभाई चौहान, महाराष्ट्र राज्य इंग्रजी माध्यम खाजगी शैक्षणिक संस्था संघाच्या अध्यक्षा सुदर्शना त्रिगुणाईत, एन डी भुट्टा हायस्कूल अंधेरी च्या प्रशासकीय अधिकारी तेहरिम शेख, आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते .



संस्थेचे अध्यक्ष योगेश हनूरकर यांनी प्रास्ताविकातून शाळेविषयी आतापर्यंत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची माहिती उपस्थित सर्व पाहुण्यांना व पालक वर्गांना करून दिले. तसेच शाळेच्या उन्नतीसाठी भूखंड उपलब्ध करून देण्यासाठी मदत करण्याचे आवाहन केले.

आमदार नरेंद्र पाटील यांनी भूखंड संदर्भात आपण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मार्ग काढण्यासाठी पाठपुरावा करू असे आश्वासन दिले. तसेच माजी महापौर सुधाकर सोनवणे यांनी उपस्थित सर्व पालक वर्ग व पाहुण्यांना संबोधित करताना बालकलाकारांचे कौतुक तर केलेच तर शैक्षणिक क्षेत्रात गरीब सवर्गातील विद्यार्थी विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या शाळेला आपले सामाजिक कर्तव्य म्हणून सर्वांनी त्यांच्या पंखांना बळ दिले पाहिजे अशा शब्दातून आपले मत व्यक्त केले. सदर कार्यक्रमचे सूत्रसंचालन राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालयाचे प्राध्यापक अमोल कुमार वाघमारे यांनी अत्यंत खुमासदार शैलीत केले. शाळेच्या मुख्याध्यापिका नेहा मारुती गवळी, अमोल खिलारे, चंद्रकांत बरफ, दीपक नवले, शितल जुनघरे, मनीषा शिलीमकर, वर्षा शिर्के, सुधा शर्मा, ज्योती ससाणे , सुवर्णा चासकर, सविता सावंत, मोनिका यादव, प्रणाली यादव, रेश्मा धुमाळ, शिल्पा मोरे, वेदांत मांडवकर, अलका पवार या शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व पालक वर्गांनी विशेष मेहनत करून कार्यक्रम पार पाडला. त्यांच्या कार्यक्रमाचे परिसरात सर्वत्र जोरदार कौतुक केले जात आहे.

## रेल्वे सुरक्षा बल डोंबिवली; नवीन इमारतीच्या शुभारंभ



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२१, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली स्टेशन रेल्वे सुरक्षा बल यांचे कार्यालय गेल्या कित्येक वर्षापासून दुरवस्था मध्ये होते. मात्र नवीन इमारतीचे शुभारंभ नवी दिल्लीचे महासंचालक मनोज यादव (IPS) यांच्या हस्ते सोमवार, दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला. नवीन इमारतीत प्रवेश करण्यासाठी रेल्वे सुरक्षा बलाचे वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र राऊत यांनी दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी वास्तुशांतीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमांमध्ये रेल्वे संरक्षण दलाचे विभागीय आयुक्त ऋषी शुक्ला यांनी आपली उपस्थिती दर्शवली. शिवाय त्यांच्या सोबत मध्य रेल्वे डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि अंमलदार, रेल्वे स्टेशन मास्टर, तिकीट निरीक्षक, आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी रेल्वे सुरक्षा बल डोंबिवलीचे वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र राऊत तसेच अधिकाऱ्यांनी आणि जवानांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## कुंडलवाडी पोलिसांनी सापळा रचला अन् अवैध गुटखा पकडला



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२०, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडीयेथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैद्य गुटख्याची वाहतूक करीत असलेल्या एका इसमास कुंडलवाडी पोलिसांनी नुकतेच पकडून त्याच्याकडील ८२ हजार ६७१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कुंडलवाडी पोलिसांनी गुटखा माफीयावर पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत संपते यांच्या आदेशानुसार शहरात धाडसत्र सुरू केले आहे. त्याच अनुषंगाने डोर मार्ग नायगाव कडे अवैधरित्या गुटखा वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाल्यावर सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे, पोलीस उपनिरीक्षक नारायण शिंदे, बीटजमादार शंकर चव्हाण, पोलिस अंमलदार देशमुख आदींनी तात्काळ घटनास्थळी पोहचवून श्रीनिवास भाऊराव देगावे, राहणार सालेगाव, तालुका धर्माबाद यांच्याकडून ३२ हजार ६७१ रुपयाचा अवैध गुटखा व ५० हजार रुपयाची मोटरसायकल असा एकूण ८२ हजार ६७१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरील इसमावर गुन्हा दाखल सी.आर ०५/२०२५, कलम १२३, २७४, २७५ अनन्वेय भारतीय न्याय संहिता २०२३ यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. अशी माहिती पोलीस सहाय्यक निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी दिली.

# खासदार मिनी मॅरथॉन-२०२५ स्पर्धेत ७०० पेक्षा जास्त स्पर्धकांचा सहभाग

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, मुंबई :** हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती व मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत आयोजित करण्यात आलेल्या खासदार मिनी मॅरथॉन-२०२५ स्पर्धेचे आयोजन नुकतेच जोगेश्वरी येथील मातोश्री क्लब येथे करण्यात आले होते.

यावेळी विविध स्पर्धांमध्ये जवळपास ७०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी भाग घेतला होता. सकाळी ७ वाजता खासदार रविंद्र वायकर व मनीषा वायकर यांच्या हस्ते




झेंडा दाखवून स्पर्धेला सुरवात झाली. खुल्या गटात हितेश शिंदे यांनी व ५० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील स्पर्धेत पुरुषांमध्ये नंदकिशोर उपाध्याय व महिला गटात हेमा वासवानी यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

यावेळी लहान मले, महिला व पुरुष व जेष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. या सर्वांनी झुम्बाचा मनमुराद आनंद लुटला. स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व मेडल देण्यात आले. यावेळी फोर्सवनचे अतिरिक्त महासंचालक सत्यप्रकाश शर्मा, महापालिकेचे उपायुक्त विश्वास मोटे, मनीषा वायकर, दिप्ती वायकर पोतनीस, डॉ.अमेय पोतनीस, डॉ.राहूल महाले, शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. स्पर्धेत अनवाणी धावणाऱ्या दुर्गानगर येथील उमाशंकर यादव याला खासदार वायकर यांच्या हस्ते बुट देण्यात आले.

## घाटकोपरच्या बेस्ट वसाहतीमध्ये हरिनाम सप्ताह जल्लोषात संपन्न

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२०, मुंबई :** घाटकोपर पूर्व येथे असलेल्या बेस्ट वसाहत उत्सव समिती, एस के सुपर मार्केट आणि बेस्ट वसाहत असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वैराग्य मूर्ती संत वामन भाऊ आणि संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त ३ दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह दि १७ ते दि १९ जानेवारी २०२५ या कालावधी मध्ये पार पडला. ह.भ.प. नामदेव महाराज शास्त्री दूधाटे यांच्या उपस्थीतीत व ह.भ.प. दादा महाराज काटे यांचे हस्ते प्रतिमा व विनापुजन करून या सोहळ्याची सुरुवात झाली. या तीन दिवसात हरिपाठ, जागर , प्रवचन, कीर्तन, भजनाचे आयोजन केले होते. बाल कीर्तनकार ह.भ.प. सोमनाथ महाराज काटे यांचे सुश्राव्य असे हरी कीर्तन झाले. तर काल्याचे कीर्तन राधाताई सानप महासांगवी यांचे झाले. स्वरानंद मृदुंग क्लासचे विद्यार्थी यांनी २१ मृदुंगाचा नाद ब्रम्ह सादर केला. संपूर्ण बेस्ट वसाहत परिसरात दिंडी प्रदक्षिणा, पांडुरंगाचा पालखी सोहळा साजरा करण्यात आला. तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. बेस्टचे सर्व पदाधिकारी रहिवाशी आणि स्थानिक माजी नगरसेवक सुरेश आवळे यांनी या सोहळ्याला मोठे सहकार्य केले. माजी मंत्री प्रकाश मेहता यांनी या कार्यक्रम स्थळी भेट दिली. सिध्देश्वर सार्वजनिक संस्था महिला भजन मंडळ, एस.के सुपर मार्केटचे मालक शंकर काटे आणि परिवार यांनी या सोहळ्याला विशेष सहकार्य केले व भव्य दिव्य वारकरी सोहळा साजरा करण्यात आला.

## सद्गुरू सेवा प्रतिष्ठान, पुणे, गरजू विद्यार्थ्यांसाठी 'सायकल बँक'



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, पुणे :** सायकल बँक या उपक्रमांतर्गत गरजू, आर्थिक दुर्बल घटकांना सद्गुरू प्रतिष्ठान कडून संस्थेमार्फत मदत केली जाणार आहे. अलिकडे पर्यावरण संरक्षणासाठी अनेक जण सायकलचा वापर करतात. पण, या सायकल काही दिवसांनंतर अशाच पडून राहतात. म्हणूनच सद्गुरू प्रतिष्ठान सायकल बँक उपक्रमाची सुरूवात केली आहे.

**विनावापर सायकल दान करण्याचे आवाहन**

या उपक्रमांतर्गत सद्गुरू प्रतिष्ठान नागरिकांना जुन्या, नादुरुस्त व विनावापर सायकल दान करण्याचे आवाहन केले आहे. या सायकल आर्थिक दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना मोफत भेट म्हणून दिल्या जाणार आहेत. शहरातील बरेच जण सायकल घेतात आणि २-३ वर्षे वापरल्यानंतर या तशाच पडून राहतात किंवा नादुरुस्त झाल्याने त्यांचा वापर करत नाहीत. अशा सायकल आपण गरीब मुलांना दान केल्या पाहिजेत. रिड्यूस, रियुज आणि रिसायकल या पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या उपक्रमात नागरिकांना योगदान देता येईल.

## फोर्टिस हॉस्पिटल मध्ये हळदी-कुंकू समारंभ संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, वाशी (नवी मुंबई) :** आपल्या व्यस्त जीवनातून थोडा वेळ काढून फोर्टिस हॉस्पिटल वाशीच्या महिला कर्मचाऱ्यांनी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी रुग्णालय व्यवस्थापक प्रीती घेवर, पर्यवेक्षक विक्रांती कदम, टीम लीडर शीतल, उषा, यांच्यासह अनेक महिला कर्मचारी उपस्थित होत्या.

महत्त्वाचे असे की, कोविड- १९ महामारीच्या काळात या महिला कर्मचाऱ्यांनी रुग्णांची मोठ्या आस्थेने सेवा केली होती. या संदर्भात जेव्हा त्यांना संसर्ग होण्याची भीती वाटत नाही का? असे विचारले असता त्यांनी सांगितले की, काम प्रथम येते, ते पूर्ण करणे हे आपले परम कर्तव्य आहे. अशाप्रकारे रुग्णांकरिता समर्पित असणाऱ्या हॉस्पिटल महिला कर्मचाऱ्यांनी आपला हळदी - कुंकू समारंभ संपन्न केला. कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी दिल्याबद्दल त्यांनी रुग्णालयाच्या व्यवस्थापनाचे आभार मानले.